महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/ २८८६९
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २४/११/२०१७

# परिपत्रक

**विषय :** अधिकारी / कर्मचा-यांकरिता विकसित करण्यात येत असलेल्या संकेत स्थळ/ प्रणालीकरिता नाव सुचविणेबाबत.

-------

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीत कार्यरत कर्मचा-यांना त्यांची वैयक्तिक माहिती सहजतेने उपलब्ध होणे, त्यातील आवश्यक ते बदल सुचविणे, वैयक्तिक सेवा जशा रजा, भविष्यनिर्वाह निधी विविध देयके, शिस्तभंग कारवाई व गोपनीय अहवाल इत्यादी बाबतची माहिती व कार्यालयीन कार्यपद्धतीत सुलभता व सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीकोनातून मानव संसाधन व्यवस्थापन प्रणालीशी संलग्नित स्वतंत्र प्रणाली सर्व कर्मचा-यांकरिता विकसित करण्यात येत आहे. ही प्रणाली कार्यालयीन कामकाजाकरिता विकसित करण्यात येत असून त्यात प्रत्येक कर्मचा-याचाही समावेश असेल.

या परिपत्रकाद्वारे कंपनीतील कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांना आवाहन करण्यात येते की, सदर विकसित होत असलेल्या प्रणाली करिता सुयोग्य व सुसंबद्ध नाव दि.०२/१२/२०१७ पर्यंत सुचविण्यात यावे. तसेच सुचविण्यात येणारे नाव हे अधिकारी / कर्मचारी यांनी managerpom@mahadiscom.in या ई-मेल वर स्वत:चे नाव, भनिनि क्रमांक, पद व कार्यरत कार्यालय या माहितीसह पाठविण्यात यावे.

(संदेश हाके)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)